# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 215/2023 दिनांक : 01.06 .2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**नायगांव** :–दिनांक 20.05.2023 रोजी 07.15 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी बेळगेनगर नायगांव ता. नायगांव जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी ही तिचे घरात काम करीत असतांना यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे घरात प्रवेश करून आरडा ओरड करून फिर्यादीचे पती शिवाजी विभुते यांचे शर्टचे कॉलर धरून तुम्ही आमचे मुलीस करणी का केली या कारणावरून आरोपीतांनी लोखंडी रॉडने फिर्यादीचे पतीचे पोटावर लोखंडी रॉडने मारून गंभीर जखमी केले व डावे हाताचे दंडावर मारून हात फॅक्चर केला व डाव्या पायाचे मांडीचे पाठीमागील बाजुस मारून जखमी केले त्यावेळी फिर्यादी ही भांडण सोडविण्यास गेली असता आरोपीने हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीचे डोक्यात मारून डोके फोडले व डाव्या पायाचे गुडघ्याखाली मारून पाय फॅक्चर केले व डाव्या पायाचे मांडीचे पाठीमागील बाजुस उजव्या पायाचे गुडघ्यास लोखंडी रॉडने मारून गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला फिर्यादी व फिर्यादीचे पतीस गंभीर मार असल्याने सरकारी दवाखाना विष्णुपूरी येथे उपचार कामी पाठवले उपचार करून फिर्यादी द्यायला उशीर झाला आहे फिर्यादीस दिनांक 28.05.2023 रोजी डिस्चार्ज देण्यात आला. वगैरे **फिर्यादी सौ. शिवलीला शिवाजी विभुते, वय 30 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. बेळगेनगर नायगांव ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगांव** गुरन 71/**2023 कलम** 307, 326, 452, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बाचावार, मो. नं. 9637320355** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**कुंटूर** :–दिनांक 30.05.2023 रोजी चे 20.30 वा. चे सुमारास, **नायगांव ते नांदेड जाणारे हायवेवर देगाव शिवार ता. नायगांव जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे ग्राहकांकडुन प्रिती गोल्ड कंपणीची वसुली करून घेतलेले 11,82,363/–रूपये निळया रंगाचे चईनचे बॅग मध्ये ठेवुन बॅग कारचे सिटचे पाठीमागे ठेवुन समोर सिटवर बसुन नायगाव ते नांदेड येत असतांना अज्ञात तीन आरोपीतांनी तोंडास पांढऱ्या रंगाचा रूमाल बांधुन आरोपीतांनी फिर्यादीस आमचे मो सायकलला कट का मारलास म्हणुन काठीने गाडीचे काच फाडुन आत ठेवलेली प्रिती गोल्ड कंपणीची वसुलीची रक्कम 11,82,363/–रूपयाची बॅग ठेवलेली जबरीने हिसकावुन घेवुन मो सायकलवर पळुन गेले. वगैरे **फिर्यादी युवराज श्रीपतराव नेवळे, वय 47 वर्षे, व्यवसाय मुनीम रा. गाडीपुरा गणेश मंदीराजवळ इतवारा. ह. मु. गुजराती शाळेजवळ वजिराबाद नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 93/2023 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री संजय अटकोरे, मो.क्रं. 8668543100** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :–

**1)मुखेड** :–दिनांक 30.05.2023 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरी शिवाजीनगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा त्यांची मुलगी बिमार असल्याने तीस नारायणा हॉस्पीटल मुखेड येथे ॲडमीट केले असल्याने फिर्यादी व त्यांची पत्नी असे दवाखान्यात असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे घराचे कडी कोंडा कुलूप तोडुन घरात प्रवेश करून कपाटातील सोन्या चांदीचे दागीने अंदाजे किंमती 1,01,800/–रूपयाचा ऐवज चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी शंकर अमृतराव वडजे, वय 37 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. बोमनाळी ह. मु. शिवाजीनगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 167/2023 कलम 454, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गजानन अंन्सापुरे, मो.क्रं. 9130052062** हे करीत आहेत.

**2)उमरी** :–दिनांक 30.05.2023 रोजी चे 02.00 ते दि. 30.05.2023 चे 10.00 वा. चे सुमारास, **132 के. व्ही. उपकेंद्र उमरी महापारेषण मौ. उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे**, यातील अज्ञात आरोपीने अंधाराचा फायदा घेवुन कंपाऊड मध्ये उडी मारून 132 के. व्ही. उपकेंद्र उमरी महापारेषण आत मध्ये प्रवेश करून तांब्याचे रॉड वजनी 84 किलो असा एकुण 42,000/–रूपयाचा मुद्येमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी उमेश गणपतराव थळंगे, उपकार्यकारी अभियंता 132 के व्ही उपकेंद्र उमरी महापारेषण ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 139/2023 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2164 भालेराव, मो.क्रं. 7030221125** हे करीत आहेत.

**3)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 30.05.2023 रोजी चे 22.00 ते दि.31.05.2023 रोजी चे 02.30 वा. चे दरम्यान, **मौ. तुप्पा ता. जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी व त्यांचे कुटूंबीयांना गर्मी होत असल्याने फिर्यादी उठून घराचा दरवाजा उघडा ठेवुन झोपला असता यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे आईने ठवेलेले गटाचे तीस हजार रूपये घरातील कपाटातुन चोरून नेले. वगैरे **फिर्यादी रवीकुमार पि. भिमराव पंडीत, वय 35 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. तुप्पा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 386/2023 कलम 380, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1238 मुपडे, मो.क्रं. 9823333377** हे करीत आहेत.

## 4)मोबाईल चोरी :–

**भोकर :–**दिनांक 31.05.2023 रोजी चे 15.00 वा. चे सुमारास, **बुलढाणा आर्बन बँक भोकर जवळ ता. भोकर जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा त्याचे आयचर वाहन घेवुन थांबला असता एक अनोळखी इसमाने फिर्यादीचा विवो कंपणीचा मोबाईल किंमती 16,900/–रूपयाचा गाडीत ठेवलेला डिक्कीमधुन एका अनोळखी इसमाने काढुन चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शेख हैदर पि. शेख आबेद, वय 27 वर्षे, व्यवसाय चालक रा. हाश्मी कॉलनी बटाळा रोड भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 199/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/जाधव, मो.क्र. 9552500871** हे करीत आहेत.

## 5)अवैध रेती चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 31.05.2023 रोजी चे 00.25 वा. चे सुमारास, **भगवान बाबा चौक लातुर रोड ता. जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून हायवा टिपर क्रमांक एमएच–26/बीई–4313 किंमती 16,00,000 मध्ये पाच ब्रास रेती किंमती 25,000/–रूपयाची बिना परवाना बेकायदेशिरीत्या चोरटी विक्री करण्याच्या उद्दशाने वाहतुक करीत असतांना एकुण 16,25,000/–रूपयाचे माला सह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री उध्दव कोंडीबा भारती, , ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 385/2023 कलम 379, 34 भादवी, सह कलम 48 महसुल कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गिते, मो. क्र. 9158762001** हे करीत आहेत.

## 6)शासकीय कामात अडथळा :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 31.05.2023 रोजी चे 13.40 वा. चे सुमारास, **यशवंत महाविद्यालय नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीची बी ए प्रथम वर्षाची परिक्षा संपल्यानंतर हॉल समोरील वरांडयात फिर्यादीने आरोपीस हातकडी लावत असतांना पळुन जाण्याच्या उदेशाने शासकीय कामात अडथळा निर्माण करून फिर्यादीचा गळा धरून गळयाला ओरखडुन शर्टचे दोन बटन तोडुन किरकोळ जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी पोकॉ/107 सुनिल रमनराव डोईबळे, ने. पोलीस मुख्यालय नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 162/2023 कलम 353, 332, 224, 506 भादवी, कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माणिक डोके, मो. क्र. 8652147575** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 31.05.2023 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **सपनाबार रेल्वेस्टेशन रोडवर नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 14,180/–रूपयासह मिळुन आले. **फिर्यादी पोकॉ/भाऊसाहेब पंडीत राठोड, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 194/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/11 सोनटक्के, मो.क्रं. 8805007511** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 31.05.2023 रोजी चे 18.35 वा. चे सुमारास, **कलामंदीर पावडे वाईन शॉपीच्या सार्वजनिक रोडवर नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 15,240/–रूपयासह मिळुन आले. **फिर्यादी पोकॉ/बालाजी पंढरीनाथ कदम, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 195/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/412, मो.क्रं. 8329585283** हे करीत आहेत.

## 8)गळफास घेवुन आत्महत्या :—

**1)नांदेड ग्रामीण :—**दिनांक 30.05.2023 रोजी चे 21.00 वा. चे पुर्वी, **चिंचाच्या झाडाच्या फांदीला विष्णुपूरी नांदेड येथे**, यातील **मयत नामे एकनाथ मारोती हंबर्डे, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. दुर्गवाडा ता. जि. नांदेड**, यांनी सततचे नापीकीस व बँकेच्या कर्जास कंठाळुन चिंचाचे झाडाला नायलोन दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार उमेश एकनाथ हंबर्डे, वय 22 वर्षे, व्यवसाय शेती रा. दुर्गवाडा विष्णुपूरी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** आ. मृ. **58**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जामोदकर, मो.नं. 9823333377** हे करीत आहेत.

**2)मुखेड :—**दिनांक 31.05.2023 रोजी चे 13.45 वा. चे पुर्वी, **मयताचे राहाते घरी मौ. पाळा ता. मुखेड जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे माधव गंगाधर डुमणे, वय 35 वर्षे, रा. पाळा ता. मुखेड जि. नांदेड**, यांनी सततचे नापीकीस व बँकेच्या कर्जास कंठाळुन लाकडाचे तुळईस गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार आनंद गंगाधर डुमणे, वय 39 वर्षे, व्यवसाय शेती रा. पाळा ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मुखेड** आ. मृ. **27**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री बोधगीरे, मो.नं. 8369695184** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड